अमृत बहुविध शिक्षण संस्था, औरंगाबाद संचलित उर्दू प्राथमिक शाळा कांचीवाडा, औरंगाबाद ही उर्दू माध्यमाची विनाअनुदानित शाळा, जिक्रा एज्युकेशन सोसायटी, जामनेर, जि.जळगांव संस्थेस हस्तांतरीत करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
शासन निर्णय क्रमांकः प्राशाह ३०१७/प्र.क्र.३६७/एसएम-१
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
दिनांक : ०२ जानेवारी, २०१८

वाचा : शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय क्रमांक माशाह २०११/ (२१०/११) माशि-३, दिनांक १७ फेब्रुवारी, २०१२

संदर्भ : विभागीय शिक्षण उपसंचालक, औरंगाबाद यांचे क्र.शिउसं/प्रावि-१/२०१२-१३/३२६८/७०, दिनांक ४ नोव्हेंबर, २०१३ चे पत्र.

प्रस्तावना :

अमृत बहुविध शिक्षण संस्था, औरंगाबाद संचलित उर्दू प्राथमिक शाळा कांचीवाडा, औरंगाबाद ही उर्दू माध्यमाची विनाअनुदानित शाळा जिक्रा एज्युकेशन सोसायटी, जामनेर, जि.जळगांव संस्थेस हस्तांतरण करण्याचा संदर्भाधीन पत्रान्वये शासनास प्राप्त झालेला प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

शासन निर्णय :

अमृत बहुविध शिक्षण संस्था, औरंगाबाद संचलित उर्दू प्राथमिक शाळा कांचीवाडा, औरंगाबाद या उर्दू माध्यमाच्या विनाअनुदानित शाळेचे जिक्रा एज्युकेशन सोसायटी, जामनेर, जि.जळगांव या संस्थेस हस्तांतर करण्यास खाली नमूद अटी व शर्तीवर मान्यता देण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे :-

१) अमृत बहुविध शिक्षण संस्था, औरंगाबाद या संस्थेच्या अद्ययावत परिशिष्ट-१ ची प्रत सादर करण्यात यावी व या अद्ययावत परिशिष्ट-१ मधील अध्यक्ष व सर्व सदस्य यांचे शाळा हस्तांतरणास संमतीपत्र रू.१००/- च्या स्टँम्पपेपरवर घेण्यात यावे.

२) सदर शाळेचे स्थावर मालमत्तेशिवाय व्यवस्थापन बदल होत असल्याबाबत दोन्ही संस्थांच्या परिशिष्ट-१ मधील सदस्यांच्या स्वाक्षरीत छायाचित्रांसह नोटराईज्ड प्रतिज्ञापत्र सादर करावे किंवा स्थावर जंगम मालमत्तेसह व्यवस्थापन बदल होत असल्याचे वा धर्मादाय आयुक्तांचे मान्यता आदेश सादर करणे आवश्यक राहील.

३) सदर व्यवस्थापन बदल प्रकरणी दोन्ही शैक्षणिक संस्थेच्या सचिव व अध्यक्ष यांचे साक्षांकित छायाचित्रांसह स्वाक्षरीचे नमुने याबाबत नोटराईज्ड शपथपत्र सादर करणे आवश्यक राहील.

४) व्यवस्थापन बदल झालेल्या शाळेची कोणत्याही कारणास्तव किमान पटसंख्येची अट शिथील केली जाणार नाही. तसेच शैक्षणिक वर्ष २०२०-२१ पर्यंत शाळेतील पटसंख्या २०० किंवा त्यापेक्षा जास्त असणे संस्थेस आवश्यक राहील. ही अट अपूर्ण राहील्यास या शाळेची मान्यता आपोआप रद्द

होईल. याबाबत नवीन संस्थेचे अध्यक्ष/सचिवांचे रू.१००/- च्या स्टँम्पपेपरवर नोटरी केलेले शपथपत्र सादर करणे आवश्यक राहील.

५) बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ नुसार व शासनाकडून याबाबत वेळोवेळी देण्यात येणाऱ्या आदेशानुसार, पक्की इमारत, वर्गखोल्या, खेळाचे मैदान इ. सर्व भौतिक सुविधांची तसेच शैक्षणिक सुविधांची पूर्तता /करणे आवश्यक राहील. याबाबत नवीन संस्थेचे अध्यक्ष/सचिवांचे रू.१००/- च्या स्टँम्पपेपरवर नोटरी केलेले शपथपत्र सादर करणे आवश्यक राहील.

६) शाळेत सध्या कार्यरत शिक्षक/ शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे हस्तांतरणास संमतीपत्र सादर करणे आवश्यक राहील. सदर शिक्षक/ शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना सामावून घेण्यात येईल व त्यांच्या सेवाशर्तीमध्ये बदल होणार नाही. याबाबत नवीन संस्थेचे अध्यक्ष/सचिवांचे रू.१००/- च्या स्टँम्पपेपरवर नोटरी केलेले शपथपत्र सादर करणे आवश्यक राहील.

७) सदर शाळा अनुदानाच्या ज्या तत्वावर आहे, हस्तांतरणानंतर त्याच तत्वावर राहील. सदर शाळा इंग्रजी माध्यमाची कायम विनाअनुदानित असल्याने, शाळेतील मंजूर व कार्यरत शिक्षक/ शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे व इतर संपूर्ण आर्थिक दायित्व संस्थेवर राहील.

८) व्यवस्थापन बदल झालेल्या शाळेच्या बाबतीत शासन परवानगीच्या/ मान्यतेच्या कोणत्याही अटी व शर्तीमध्ये बदल होणार नाही याबाबत नवीन संस्थेचे अध्यक्ष/सचिवांचे शपथपत्र घेण्यात यावे.

९) शासनाकडून शाळा, शिक्षक/शिक्षकेतर कर्मचारी, वेतन/ वेतनेतर अनुदान, विद्यार्थी इ. बाबत वेळोवेळी विहित करण्यात येणारे अधिनियम, नियम, आदेश इ. चे पालन करणे नवीन संस्थेस बंधनकारक राहील.

१०) शासन निर्णय, दिनांक २८/०८/२०१५ नुसार विहित केलेल्या संच मान्यतेच्या सुधारित निकषानुसार व याबाबत शासनाकडून वेळोवेळी देण्यात येणाऱ्या आदेशांनुसार अनुज्ञेय पदांइतके शिक्षक/ शिक्षकेतर कर्मचारी शाळेत कार्यरत राहतील व त्यापेक्षा जास्त शिक्षक/ शिक्षकेतर कर्मचारी कार्यरत राहणार नाहीत हे संस्थेस बंधनकारक राहील. तसेच अनुज्ञेय पदांपैकी रिक्त पदे अतिरिक्त शिक्षक/ शिक्षकेतर कर्मचाऱ्यांमधून समायोजनाने भरण्याबाबत शासनाच्या धोरणानुसार कार्यवाही करणे आवश्यक राहील.

११) सदर शाळा औरंगाबाद येथे असून या शाळेचे हस्तांतरण होत असलेली संस्था जळगाव येथील आहे. या कारणास्तव शाळेचे अन्य जिल्हयात स्थलांतर करण्याची मागणी करता येणार नाही.

१२) सदर व्यवस्थापन बदल, शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रमांक माशाह २०११/(२१०/११) माशि-३, दिनांक १७ फेब्रुवारी, २०१२ मध्ये विहित केलेल्या नियमानुसार व कार्यपध्दतीनुसार अंमलात येईल.

१३) सदरहू व्यवस्थापन बदलासंदर्भात शासनाकडे अथवा शिक्षण विभागाच्या क्षेत्रिय अधिकाऱ्यांकडे कोणत्याही प्रकारच्या तक्रारी प्राप्त झाल्यास किंवा व्यवस्थापन बदल संदर्भातील अटी व शर्तीचा भंग झाल्याचे निदर्शनास आल्यास किंवा व्यवस्थापन बदलापूर्वीच्या संस्थेतील कार्यरत शिक्षक/शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या सेवाशर्तीचा नवीन संस्थेव्दारा भंग झाल्यास, हस्तांतरण रद्द करण्याचे अधिकार शासनास राहतील.

२. वरील अट क्र.(१), (२) व (३) येथील कागदपत्रांची पूर्तता संस्थेने ६ महिन्यात विभागीय शिक्षण उपसंचालक, औरंगाबाद यांचेकडे करणे आवश्यक राहील. या कागदपत्रांची पूर्तता विहीत कालावधीत न केल्यास सदर बाब शासनाच्या निदर्शनास आणणे आवश्यक राहील. तसेच अट क्र.

(४), (५) व (६) ची पूर्तता झाल्यावर विभागीय शिक्षण उपसंचालक, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांनी सर्व बाबी तपासून आणि आवश्यक अन्य अटींचा समावेश करून, शाळेच्या व्यवस्थापन बदलाबाबत आवश्यक पुढील कार्यवाही करावी व केलेल्या कार्यवाहीबाबत शासनास अवगत करावे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०१०३११०००३१४२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Swati Madhukar Nanal

Digitally signed by Swati Madhukar Nanal
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=School Education And Sports Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=82e1d6f07c5cabf5884958ee70015d36b35b2c07e9700fe62cba2439a81b4be4, serialNumber=007d84f8ce44beba86b0ca2d0155d67cc1a9db4f8d59bc9d8067628d62bcdc1a, cn=Swati Madhukar Nanal
Date: 2018.01.03 11:05:33 +05'30'

(स्वा.म.नानल)

उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत :

१) शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे

२) विभागीय शिक्षण उपसंचालक, औरंगाबाद विभाग,
मुलींचे आयटीआय समोर, मनपा रोड, मिपा इमारत, भडकलगेट, औरंगाबाद

३) शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद

४) अध्यक्ष, अमृत बहुविध शिक्षण संस्था, कबाडीपुरा, जि.औरंगाबाद

५) अध्यक्ष, जिक्रा एज्युकेशन सोसायटी, जामनेर, ता.जामनेर, जि.जळगांव

६) निवडनस्ती (एसएम-१).